नाशिक जिल्हा परिषद नाशिक
जा.क्र.शिक्षण/प्राथ/लेखा२/ 266 /२०१८
दिनांक १५/०४/२०१८

प्रति, १) ------------------------------------

२) ------------------------------------

३) ------------------------------------

**विषय :-शाळांसाठी ई-लर्निंग साहित्य पुरविणेसाठी दरपत्रक मागविणे बाबत.**

उपरोक्त विषयान्वये सन-२०१६-२०१७ अंतर्गत जि.प.प्रा.शाळा दोधेश्वर,सटाणा,काकडगांव ता.बागलाण.जि. नाशिक या शाळांसाठी ई-लर्निंगचे साहित्य करावयाच्या आहेत त्यासाठी आपण आपले दरपत्रक वस्तुनिहाय दर नमूद करुन बंद पाकिटात हया कार्यालयास खालील अटी व शर्तीनुसार आपल्या लेटरहेडवर खालील सर्व कागदपत्रांसह मोहरबंद लिफाफामध्ये सर्व करांसह व हमाली ,वाहतुक इ.खर्चासह नमुद करावे. अटी व शर्ती खालील प्रमाणे आहेत.

१. सदरचे साहित्य शाळेवर पोहच करावी लागेल.
२. ई-लर्निंग साहित्य Specification (स्फेसिफिकेशन) स्वखर्चाने शाळेवर जोडणी करुन दयावे लागतील.
३. पुरवठा करण्यात येणारे साहित्य हे मंजूर Technical Specification (स्फेसिफीकेशन) नुसार असलेबाबत व त्याची गुणवत्ता दर्जा योग्य असलेबाबतची तपासणी शासकीय प्रयोगशाळेतून स्वखर्चाने करण्यात येऊन तसे प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक राहील.
४. दरपत्रक सादर करण्यासाठीची वेळ. १० ते ५ सायंकाळ पर्यंत व दिनांक१७/ ०४/२०१८ ते २५/ ४/२०१८ किमान एक आठवडा ठिकाण - शिक्षण विभाग (प्राथ) जि.प.नाशिक.
५. दरपत्रक उघडण्यासाठीची वेळ. सकाळी १० = ०० वाजता दिनांक २६/ ०४/२०१८ रोजी ठिकाण शिक्षण विभाग (प्राथ) जि.प.नाशिक दरपत्रक अपरिहार्य कारणास्तव उघडले गेले नाहित तर पुढील तारीख देण्यात येईल.
६. दरपत्रका सोबत खालील प्रमाणे प्रमाणपत्रे सोबत जोडावेत.
   i. मुंबई शॉप ॲक्ट इस्टॅब्लिशमेंट अंतर्गत प्रमाणपत्र
   ii. पॅन कार्ड आवश्यक.
   iii. जीएसटी प्रमाणपत्र आवश्यक आहे.
७. नियमानुसार आयकर कपात करण्यात येईल.
८. दरपत्रक सादर करतांना नाशिक येथे लागु असलेले सर्व कर ( जीएसटी) इतर कर व शुल्क वाहतुक सर्व इत्यादी साहीत्याचा किंमती पासुन वेगळे दर्शविण्यात यावे.
९. पुरवठा आदेशाच्या दिनांकापासुन १५ दिवसाच्या आत साहित्य पुरवठा करणे बंधनकारक राहिल.
१०) मुदतीत साहित्य पुरवठा न केल्यास पुरवठा न केलेल्या साहित्याच्या किंमतीवर प्रति आठवडा १/२ (अर्ध्या) टक्के प्रमाणे दंड आकारणी करण्यात येईल.
११.एका व्यक्तीस एक दरपत्रक सादर करता येईल.
१२. दर नमुद करताना प्रति नगाचे दर नमुद करुन त्याची एकुण बेरीज नमुद करावी.
१३.दरपत्रक अंशत: अथवा पुर्णता मंजुरी / नामंजुरीचे सपुर्ण अधिकार निम्नस्वाक्षरीत यांनी राखुन ठेवले आहेत.
१४. वरील अटी शर्ती मान्य असल्याचे आपल्या लेटर हेडवर सर्व अटी शर्ती नमुद करुन स्वाक्षरीसह दरपत्रकासह सादर करावे.
१५. वरील अटीशर्ती च्या अनुषगांने रु १००/-च्या स्टॅम्पपेपरवर करारनामा करुन द्यावा लागेल.
१६. सदर योजनेचे प्रत्यक्ष अनुदान विभागाकडे प्राप्त झालेनंतरच पुरवठा आदेश निर्गमित करणेत येईल.

17.4.18
(डॉ. वैशाली झनकर)
**शिक्षणाधिकारी (प्राथमिक)**
**जिल्हा परिषद नाशिक**

**पुरवठा करावयाचे साहित्य विवरण (स्फेसिफीकेशन) खालील प्रमाणे आहेत.** All in one interactive Projector,LC D LED Projector with in built PC in to run Windows 10 , Latest intel Quod core CPU, minimum 2 GB RAM, 32 GB SSD+64 GB SD Card ,AV,VAG, ybper, HDMI, USB, wifi,Bluetooth inputs Inbuilt interactive module to convert any surface to touch screen

17.4.18
(डॉ. वैशाली झनकर)
**शिक्षणाधिकारी (प्राथमिक)**
**जिल्हा परिषद नाशिक**

प्रत, मा.उप मुख्य कार्यकारी अधिकारी (साप्रवि) जि.प.नाशिक.
२/- वरिल प्रमाणे दरपत्रक मागविणेसाठी विभागाच्या वेबसाईटवरती टाकावी ही विनंती.

17.4.18
Education Officer, (Pry.)
Zilla Parishad, Nasik
(डॉ. वैशाली झनकर)